महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १८६ वे दिनांक : ०१/०७/२०२६ वार : बुधवार

## "मी जे करतो ते फुलप्रूफच करतो"; सचिन अहिरांच्या पक्षप्रवेशावर शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाला आणखी एक मोठा धक्का बसला असून सचिन अहिर यांनी ठाकरे गटाला रामराम करत थेट शिंदे सेनेकडून उपसभापती पदाचा अर्जही भरला आहे. त्यामुळे हा उद्धव ठाकरे यांच्यासह आदित्य ठाकरे यांनाही मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे. त्यामुळे राज्यात ऑपरेशन टायगर सुरूच असल्याची चर्चा सध्या राजकीय वर्तुळात सुरू आहे.

ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर यांनी विधान परिषद उपसभापतीपदासाठी महायुतीकडून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या घडामोडीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत सचिन अहिर यांचे पक्षात स्वागत केले आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार निशाणा साधला. "आम्ही कोणतेही तोडकाम करत नाही, जोडकाम करतो," असे सांगत शिंदे यांनी शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या नेत्यांमागे विकासाचा अजेंडा असल्याचा दावा केला.

पत्रकार परिषदेत बोलताना शिंदे म्हणाले, "नुकतेच सहा खासदारांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. आज सचिन अहिर यांनीही आमच्यासोबत येण्याचा निर्णय घेतला आहे. काही लोक सहा मतदारसंघांमध्ये जाऊन आले आणि त्यांचे सचिन अहिर यांनी षटकार मारून स्वागत केले आहे. खरं तर चौकार-षटकार सुरूच राहतील आणि समोरच्यांच्या विकेट्स पडतच राहतील."

सचिन अहिर यांच्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करत शिंदे म्हणाले की, "सचिन अहिर हे माजी राज्यमंत्री आहेत. गिरणी कामगारांचे नेते म्हणून त्यांनी मोठे काम केले आहे. विविध कामगार संघटनांमध्ये त्यांनी नेतृत्व केले. मुंबईतील भूमिपुत्र, कोळीवाडे आणि स्थानिकांच्या प्रश्नांची त्यांना सखोल जाण आहे. ते ग्रासरूट स्तरावर काम करणारे नेते आहेत. त्यामुळे त्यांच्या आगमनाने शिवसेनेची ताकद आणखी वाढणार आहे."

एकनाथ शिंदे म्हणाले, सचिन अहिर यांनी आज विधानसभा उपसभापती पदाचा फॉर्म भरला आहे, महायुतीचा फॉर्म भरला आहे. महायुती आज बहुमतात आहेत. त्यामुळे ते उपसभापती म्हणून उद्या त्यांची निवड होईल आणि ते फक्त मुंबईच नाही तर महाराष्ट्रात उपसभापती म्हणून न्याय देण्यासाठी काम करतील. ते आल्यामुळे शिवसेनेची देखील ताकद वाढली आहे. कामगार क्षेत्र असेल, मुंबई असेल पुणे असेल, त्यांनी जिथे काम केले आहे तिथे ताकद वाढेल.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे आणि या पक्षात त्यांनी काम करण्याचा निर्णय घेतला आहे. मी त्यांचे मनापासून स्वागत करतो. त्यांना खूप खूप शुभेच्छा देतो. 2022 ला देखील बाळासाहेबांची शिवसेना, त्यांचा विचार पुढे नेण्याचा निर्णय घेतला होता, 30 जून 2022 रोजी मी शपथ घेतली होती आणि आजही 30 जून आहे, हा योगायोग आहे. सुरुवातील मी आणि देवेंद्र फडणवीस आम्ही टीम म्हणून काम केले. पायाभूत सुविधांचा विकास केला. महाराष्ट्र जीडीपीमध्ये नंबर एक झाला आणि महाराष्ट्र वेगवान गतीने धावू लागला.

एकनाथ शिंदे म्हणाले, या महाराष्ट्राच्या जनतेने आम्हाला पुन्हा एकदा आशीर्वाद दिला आणि आमची घोडदौड सुरूच आहे. आम्ही शब्दाला किंमत देणारी संघटना आहे. मागच्या आठवड्यात आपण पाहिले की 6 खासदारांनी आपल्यासोबत येण्याचा निर्णय घेतला. शेवटी जे आपण का शिवसेनेत येतो हे प्रत्येकाने सांगितले. आपल्याला जनतेला न्याय दिला पाहिजे, ही भावना असते. आम्ही तोडायला नाही तर शिवसेना जोडायला आलो आहोत, असेही एकनाथ शिंदे यांनी यावेळी म्हटले आहे.

लोकप्रतिनिधींना काय पाहिजे? विकास पाहिजे, त्यांच्या मतदारसंघातील लोकांचा विकास करायचा असतो, त्यांचे प्रश्न सोडवायचे असतात. परंतु, लोक काय काय बोलत असतात, आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कारटे असे म्हणत असतात. मात्र ते काही असो. मी आज सचिन अहिर यांचे मनापासून स्वागत करतो. ते अष्टपैलू आहेत. बॅटिंग बॉलिंग करतात आणि आज तर गुगली टाकली आहे, असेही शिंदे यांनी यावेळी अहिर यांच्या विषयी बोलताना म्हटले.

अलीकडेच उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल मवाळ भूमिका घेतल्याच्या चर्चेवर शिंदेंनी सडकून टीका केली.

"हे केवळ मगरीचे अश्रू आणि 'पुतना मावशीचे प्रेम' आहे. २०१९ मध्ये देवेंद्रजींनी ५० फोन करूनही ज्यांनी एकही फोन उचलला नाही, ज्यांनी 'एक तर तू राहशील नाहीतर मी राहीन' अशी भाषा वापरली आणि महाविकास आघाडीच्या काळात देवेंद्रजींवर खोटे गुन्हे दाखल करण्यासाठी त्यांच्या सागर बंगल्यावर पोलीस पाठवले, त्यांचे हे प्रेम बेगडी आहे. देवेंद्रजी हुशार आहेत, त्यांना हे सर्व कळते," असा थेट हल्लाबोल शिंदेंनी केला.

ठाकरे गटाचे आणखी कोणते आमदार संपर्कात आहेत का? या प्रश्नावर एकनाथ शिंदे यांनी सस्पेन्स कायम ठेवला. "आजच सगळं सांगितलं, तर उद्याची ब्रेकिंग न्यूज काय असेल? थोडी वाट पाहा, विकेट धडाधड पडत राहतील," असा इशारा त्यांनी दिला. आम्ही तोडकाम करत नसून जोडकाम करत आहोत, असेही ते म्हणाले.

विशेष म्हणजे, उपसभापती पदासाठी ज्यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा होती, त्या माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यादेखील या पत्रकार परिषदेला हजर होत्या. 'सचिन अहिर यांना उमेदवारी दिल्याबद्दल आपली कोणतीही नाराजी नाही,' असे त्यांनी स्पष्ट केल्याने शिंदे गटातील संभाव्य अंतर्गत नाराजीच्या चर्चांनाही पूर्णविराम मिळाला आहे.

## "ऑपरेशन देवेंद्र फडणवीस"; आदित्य ठाकरेंचा थेट आरोप



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाला आणखी एक मोठा धक्का बसला असून सचिन अहिर यांनी ठाकरे गटाला रामराम करत थेट शिंदे सेनेकडून उपसभापती पदाचा अर्जही भरला आहे. त्यामुळे हा उद्धव ठाकरे यांच्यासह आदित्य ठाकरे यांनाही मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे. यावर आता आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ज्यांना सगळे दिले तेच स्वार्थासाठी सोडून जात असल्याची टीका ठाकरे यांनी केली आहे.

आदित्य ठाकरे म्हणाले, आम्ही अनेक दिवस, गेले 4 दिवस आम्ही पाहत आहोत, ज्या लोकांना सगळं काही मिळतं तेच स्वतःच्या स्वार्थासाठी निघून जात आहेत. यात धक्का बसण्यासारखे काही नाही. वरळी, शिवडी हा आमचा बालेकिल्ला आहे आणि तिथे आमचे काम बोलते. पण एकच दुर्दैव आहे की ज्यांना आम्ही सगळे काही दिले, बरं ही एक व्यक्ती अशी आहे की आदित्य ठाकरे भेटत नाही, असं नव्हतं. परवा येताना आम्ही पुण्यातून सोबतच आलो. एवढे असूनही तुम्हाला अजून काय पाहिजे आहे, अजून किती ओरबाडणार आहात?

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, स्वतः आमदार आहेत, जी प्रभाग समिती आहे त्यांच्या मुलीला आम्ही एनजीओचा जो कोटा असतो त्यातून समिती दिली आहे. कामगार सेनेत पद दिले होते, शिवसेनेत पद दिले होते. एवढे सगळे होऊन देखील बीएससी तर आहेच, अजून तुम्हाला काय पाहिजे? आम्ही काही कमी दिलं का? रोज भेटत होतो? रोज काय करायचे होते तुमच्यासाठी? आरत्या करायच्या होत्या का? असा सवालही ठाकरे यांनी केला आहे.

लोकशाहीचे काय होणार, संविधानाचे काय होणार, असे अनेक विचार आहेत. मला सचिन भाऊ यांना देखील प्रश्न विचारायचा आहे की जे आपली मंदिरे लुटत आहेत, उज्जैनमध्ये जमीन घोटाळा केला, अयोध्यामध्ये जमीन घोटाळा केला, अशी हिंदू मंदिरे लुटणाऱ्यांसोबत तुम्ही कसे बसू शकता? संविधान बदलण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांच्यासोबत कसे बसू शकता? हे ऑपरेशन टायगर नसून ऑपरेशन देवेंद्र फडणवीस आहे, हे आम्हाला अभ्यास केल्यानंतर समजले आहे.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, वरळीमध्ये जरी ते उभे राहिले तरी फरक नाही पडणार. मला सकाळीच त्यांनी मेसेज केला की विरोधात उभा नाही राहणार, पण या बोलायच्या गोष्टी असतात. महत्त्वाची गोष्ट हीच आहे की वाराणसीमध्ये सुद्धा एकाला तीन वेळेस मागे जावे लागले होते. आज मी परत एकदा विचारत आहे की ज्यांनी राम मंदिरच्या नावावर दंगली घडवल्या, आंदोलन करायला लावले, तेच आज राम मंदिर लुटत आहेत.

माझा भाजप आणि संघाच्या लोकांना सवाल आहे की, एवढे सगळे लोक तुम्ही डोक्यावर बसवून घेतले आहे, त्यात अजून उपसभापती पदावर बसवले आहे. का नाही कोणी भाजपचा तिथे बसलेला आहे? आज इतके वर्ष घर दार सोडून भाजपसाठी काम करणारे लोक आहेत, त्यांना का नाही बसवले? हे उपरे का बसवून घेतले? हे भाजपने विचार केला पाहिजे. त्यामुळे मी पुन्हा सांगतो की हे ऑपरेशन टायगर नसून ऑपरेशन देवेंद्र फडणवीस आहे.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनीही सचिन अहिर यांच्या पक्ष सोडण्यावर टीका केली. संजय राऊत यांनी एक्स या सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. त्या पोस्टमध्ये ते म्हणतात, 'आम्ही चार किरणांचीही आस का धरावी? जे कधीच नव्हते आमचे त्याची वाट का पहावी?, पक्षात येतानाच जे स्वार्थ आणि बेईमानीचा कीडा घेऊन येतात त्यांच्या जाण्याचे दुःख का करावे?.'

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ जुलै २०२६

# शिक्षण वंचित घटकांच्या दारापर्यंत ज्ञानगंगा पोहचविणारे मुक्त विद्यापीठ : कुलगुरू डॉ. राम ताकवले ते डॉ. संजीव सोनवणे पर्यंतचा गौरवशाली प्रवास

आज १ जूलै यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा आज वर्धापन दिन १ जूलै १९८९ रोजी याच दिवसी एका छोट्याशा खोलीत चालु झालेले हे विद्यापीठ आज रोजी नाशिक जिल्ह्यातील गंगापूर परिसरात तब्बल १५० एकर जागेत स्थापित झाले आहे. विविध विद्याशाखा आणि लाखो विद्यार्थी असा मोठा वटवृक्ष या विद्यापीठाचा झालेला आहे. संस्थापक कुलगुरू डॉ. राम ताकवले यांची दुरदृष्टी आणि त्यानंतर आलेल्या सर्व कुलगुरूची शिक्षणाप्रती निष्ठा आणि सातत्यपूर्ण कार्य तसेच विद्यमान कुलगुरू आदरणीय प्रोफेसर डॉ. संजीव सोनवणे यांचे उत्कृष्ठ प्रशासन, शैक्षणिक अनुभवच, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर, प्रवेश पद्धती आणि परिक्षा पद्धतीतील अमुलाग्र बदल, कौशल्याधारित नव-नवीन शिक्षण क्रमांची भर यामुळे आज हे विद्यापीठ भारतातीलच नाही तर जागतिक पातळीवर देखील आपल्या कार्य कर्तृत्वाचा झेंडा अभिमानाने मिरवत आहे. ग्रामीण विद्यार्थी, नोकरदार घरकाम करणाऱ्या महिला, दिव्यांग व्यक्ती आणि कुटुंबातील पहिले शिक्षण घेणार विद्यार्थी यांच्यासाठी पारंपारिक विद्यापिठाचे दरवाजे अनेकदा धोरनात्मक कारणामुळे नव्हे, तर व्यवहारिक परिस्थितीमुळेप्रभावीपणे बंदच राहिले. लाखो भारतीयांना उच्च शिक्षणासाठी दीर्घकाळापासून एका साध्या पण प्रभावी अडथळ्याचा सामना करावा लागत होता. ते प्रत्यक्ष महाविद्यालय किंवा विद्यापीठात उपस्थित राहू शकत नव्हते. भौगोलिक परिस्थिती , काम कौटुंबिक जबाबदाऱ्या किंवा आर्थिक अडचणी यापैकी कोणत्याही कारणामुळे, पारंपारिक वर्गखोली त्यांच्या आवाक्याबाहेर होती. दर्जेदार उच्च शिक्षणाची व्यापक उपलब्धता साध्य करण्यासाठी एकमेव व्यवहारिक उपाय होता. या आव्हानाला भारताने दिलेले उत्तर म्हणून मुक्त विद्यापीठे उदयास आली. सप्टेंबर १९८५ मध्ये इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नू) या केंद्रीय विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची (वायसीएमओयु) स्थापना १ जुलै १९८९ रोजी झाली व त्याचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा प्रवास ३००० विद्यार्थी संख्येने १९८९ पासून सुरु झाला. संस्थापक कुलगुरू १९८९ पासून सुरु झाला. संस्थापक कुलगुरू डॉ.राम ताकवले यांनी सर्वसामान्यांपर्यंत मुक्त विद्यापीठाद्वारे उच्च शिक्षण पोहोचवण्यासाठी अथक प्रयत्न केले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, गावोगावी स्वतः फिरून, मुक्त विद्यापीठाचा प्रचार केला व तळागाळापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवली. सुरुवातील, जवळपास ३००० विद्यार्थी संख्या असलेल्या विद्यापीठाची विद्यार्थी संख्या ०६ लाख ५० पर्यंत पोहोचली. त्यात डॉ.उत्तमराव भोईटे, प्राचार्य.अशोक प्रधान, डॉ.बाबुराव साबळे, डॉ.राजन वेळूकर, प्रा.डॉ.सुधीर डब्ल्यू गव्हाणे, डॉ.आर.कृष्णकुमार, डॉ.माणिकराव एम.साळुंखे, प्रा.ई.वायुनंदन या माजी कुलगुरूंचा मोलाचा वाटा राहिला. वायसीएमओयु आपल्या 8 विभागीय केंद्राद्वारे आणि १७११ विद्यार्थी सहाय्य केंद्रामार्फत (अभ्यासकेंद्र) महाराष्ट्रभर ६४ युजीसी मान्यताप्राप्त शैक्षणिक अभ्यासक्रम चालवते. या शैक्षणिक कार्यक्रमामध्ये प्रमाणपत्रा पासून ते पदव्युत्तर, पदवीपर्यंत विविध विषयांचा समावेश आहे. 1989 मध्ये स्थापन झालेल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने विविध कुलगुरूंच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली मुक्त व दूरस्थ शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. **१. प्रारंभिक टप्पा (१९८९—१९९५)** विद्यापीठाची प्रशासकीय व शैक्षणिक पायाभरणअभ्यासक्रम निर्मिती व स्व-अध्ययन साहित्याची निर्मिती. प्रादेशिक केंद्रे व अध्ययन केंद्रांचे जाळे उभारण्यास प्रारंभ. **२. विस्ताराचा टप्पा (१९९५—२००५)** पदवी, पदव्युत्तर, पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांमध्ये मोठी वाढ. कृषी, शिक्षण, संगणक, व्यवस्थापन व व्यावसायिक अभ्यासक्रमांचा प्रारंभ. ग्रामीण व वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यावर भर. **३. गुणवत्ता व आधुनिकीकरण (२००५—२०१५)** अध्ययन साहित्याची गुणवत्ता सुधारणा. परीक्षा व मूल्यमापन प्रणाली अधिक सक्षम माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा शिक्षणात वापर. राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाची विश्वासार्हता वाढली. **४. डिजिटल परिवर्तन (२०१५—२०२२)** ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया. ई-लर्निंग, डिजिटल अध्ययन साहित्य व व्हर्च्युअल शिक्षण. परीक्षा व्यवस्थापनात तंत्रज्ञानाचा व्यापक वापर. कोविड-१९ काळात अखंड शिक्षण व्यवस्था. **५. नव्या युगातील प्रगती (२०२२ पासून** राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020) अनुषंगाने अभ्यासक्रमांमध्ये सुधारणा. कौशल्याधारित व रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांना प्राधान्य. डिजिटल परीक्षा, ऑनलाइन विद्यार्थी सेवा व संशोधनाला चालना. उद्योग, शैक्षणिक संस्था व सामाजिक क्षेत्राशी सहकार्य वृद्धिंगत. **विद्यापीठाची प्रमुख उपलब्धी** महाराष्ट्र तील लाखो विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी. राज्यभर विस्तृत अध्ययन केंद्रांचे जाळे. कृषी, शिक्षण, आरोग्य, व्यवस्थापन, तंत्रज्ञान, भाषा, सामाजिक विज्ञान आदी विविध क्षेत्रांतील अभ्यासक्रम. शिक्षण सर्वांसाठी सुलभ, लवचिक व परवडणारे करण्यामध्ये अग्रणी भूमिका. मुक्त व दूरस्थ शिक्षण क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त संस्था. **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. डॉ. संजीव सोनवणे : दूरदृष्टी, नेतृत्व आणि परिवर्तनाचा प्रवास** मा. प्रा. डॉ. संजीव सोनवणे यांनी २४ मे २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक) यांच्या कुलगुरूपदाचा कार्यभार स्वीकारला. मुक्त व दूरस्थ शिक्षण क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव, संशोधनातील योगदान आणि आधुनिक शिक्षण व्यवस्थेबाबतची दूरदृष्टी यामुळे विद्यापीठाच्या विकासाला नवी दिशा मिळाली. डॉ. सोनवणे हे शिक्षणतज्ज्ञ, संशोधक, प्रशासक आणि दूरदर्शी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020) ची प्रभावी अंमलबजावणी, तंत्रज्ञानाधारित शिक्षण, विद्यार्थी-केंद्रित प्रशासन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. **शैक्षणिक दृष्टीकोन** डॉ. सोनवणे यांचा विश्वास आहे की शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्यविकास आणि राष्ट्रनिर्मितीचे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे त्यांनी विद्यापीठातील अभ्यासक्रमांना उद्योग, रोजगार आणि समाजाच्या गरजांशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. **राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी** त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने NEP-2020 नुसार अभ्यासक्रमांचे पुनर्रचन, बहुविषयक शिक्षण, Academic Bank of Credits (ABC), कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि लवचिक शिक्षण पद्धती यांची अंमलबजावणी सुरू केली. **डिजिटल शिक्षणाला गती मुक्त विद्यापीठाची ओळख अधिक आधुनिक करण्यासाठी त्यांनी ई-लर्निंग, ऑनलाइन अभ्यासक्रम, डिजिटल अध्ययन साहित्य, Learning Management System (LMS), ऑनलाइन प्रवेश, परीक्षा आणि विद्यार्थी सेवा यांना मोठी चालना दिली. त्यामुळे महाराष्ट्रातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण उपलब्ध झाले. कौशल्याधारित शिक्षण** विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्यासाठी अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम, कौशल्य विकास कार्यक्रम, उद्योजकता प्रशिक्षण आणि उद्योगाभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्यावर त्यांनी भर दिला. भविष्यात लाखो कुशल मनुष्यबळ तयार करण्याचे उद्दिष्ट त्यांनी मांडले आहे. **संशोधन आणि नवोपक्रम** संशोधन संस्कृती मजबूत करण्यासाठी संशोधन प्रकल्प, नवकल्पना, पेटंट, आंतरराष्ट्रीय सहकार्य, संशोधन प्रकाशने आणि शिक्षकांच्या संशोधनाला त्यांनी प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती विकसित करण्यावरही त्यांनी विशेष भर दिला. **विद्यार्थी-केंद्रित प्रशासन** विद्यार्थ्यांच्या अडचणी कमी करण्यासाठी प्रवेश, परीक्षा, निकाल, पदवी वितरण आणि प्रमाणपत्र प्रक्रिया अधिक पारदर्शक, जलद आणि तंत्रज्ञानाधारित करण्यात आली. विद्यार्थी सेवा अधिक सुलभ करण्यासाठी विविध डिजिटल उपक्रम राबविण्यात आले. **समाजाभिमुख उपक्रम** मुक्त शिक्षणाचा लाभ ग्रामीण, आदिवासी, महिला, दिव्यांग, शेतकरी, कामगार आणि नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. "शिक्षण सर्वांसाठी" ही विद्यापीठाची संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्यात आली. **गुणवत्ता आणि राष्ट्रीय स्तरावरील स्थान** विद्यापीठाच्या शैक्षणिक गुणवत्तेत सातत्याने सुधारणा, अध्ययन साहित्याची गुणवत्ता, डिजिटल परीक्षा व्यवस्था, विद्यार्थी समाधान आणि संशोधन यांमुळे विद्यापीठाची राष्ट्रीय स्तरावर प्रतिमा अधिक उंचावली. **पारदर्शक परीक्षा : परीक्षा प्रक्रियेतील विविध पैलू** उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये परीक्षांची विश्वासार्हता आणि गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता राखणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी परीक्षेच्या नियोजनापासून ते निकाल जाहीर होईपर्यंत प्रत्येक टप्प्यावर विविध उपाययोजना मुक्त विद्यापीठामार्फत राबविण्यात येतात. माहे मे २०२६ परीक्षेत परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence — AI) आधारित तंत्रज्ञानाच्या साहाय्याने परीक्षा केंद्रांवरील हालचालींवर देखरेख ठेवली गेली. त्यामुळे गैरप्रकारांना प्रतिबंध होण्यास मदत झाली आणि परीक्षेची विश्वासार्हता अधिक बळकट झाली. याशिवाय परीक्षा केंद्रांवरील शिस्त, गोपनीयता आणि सुरक्षितता अबाधित राहावी यासाठी विविध नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्या होत्या. परीक्षा कॉपीमुक्त व शिस्तबद्ध वातावरण होण्यासाठी माननीय कुलगुरू व परीक्षा विभागाने सर्वप्रथम महाराष्ट्रात अशा प्रकारच्या परीक्षा घेण्याचा बहुमान मिळवला आहे. याकरिता विद्यापीठाचे अभिनंदन सर्व स्थरावरून करण्यात येत आहे. अशा प्रकारे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, प्रभावी नियंत्रण व्यवस्था आणि पारदर्शक प्रशासन यांच्या माध्यमातून परीक्षा प्रक्रिया अधिक विश्वासार्ह, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थीहिताभिमुख बनत आहे. **प्रशासकीय नेतृत्व** जानेवारी २०२६ मध्ये महाराष्ट्र शासनाने त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वाची दखल घेत त्यांच्याकडे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त कार्यभारही सोपविला. ही त्यांच्या प्रशासकीय क्षमतेची मोठी पावती मानली जाते. मा. प्रा. डॉ. संजीव सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आधुनिक, तंत्रज्ञानसक्षम, विद्यार्थी-केंद्रित आणि कौशल्याधारित शिक्षणाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. शिक्षणाची गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम, डिजिटल परिवर्तन आणि सामाजिक बांधिलकी यांचा समतोल साधत त्यांनी विद्यापीठाला नवी ओळख दिली आहे. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे मुक्त शिक्षण क्षेत्रात विद्यापीठ अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि राष्ट्रीय स्तरावर अग्रगण्य संस्था म्हणून विकसित होत आहे. **स्थापना दिन संदेश** "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने प्रत्येक कुलगुरूंच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली गुणवत्ता, तंत्रज्ञान, सर्वसमावेशकता आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षणाचा आदर्श निर्माण केला आहे. 'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीद साकार करत लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश पसरविणाऱ्या विद्यापीठास स्थापना दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा. भविष्यातही विद्यापीठ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक उंच भरारी घेईल, हीच सदिच्छा."



**डॉ.नंदकुमार राठी**
वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार
विभागीय केंद्र छत्रपती संभाजीनगर
मो. ८७९३५०७९२५

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ जुलै २०२६


## साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर :** बिडकीन सर्कलचे छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा परिषद गटनेता तथा जि. प. सदस्य मा. मनोजभाऊ पेरे यांच्या हस्ते नुकतेच बिडकीन येथे प्रसिद्ध साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर ता. पैठण यांचा शाल, पुष्पहार देऊन श्री.अय्युब पठाण यांचा यथोचित सत्कार करण्यात आला आहे. लेखक अय्युब पठाण यांचा बालभारतीच्या इयता चौथीच्या मराठी माध्यमाला संपूर्ण महाराष्ट्राच्या शाळेमध्ये " कौतुकाची थाप " या पाठाचा अभ्यासक्रमात समावेश झाल्याने छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा परीषद गटनेता पदी असलेले मा. मनोजभाऊ पेरे यांनी अय्युब पठाण यांचा भव्य सत्कार करून लेखक पठाण यांच्या पाठीवर आशिर्वादरूपी कौतुकाची थाप देऊन त्यांना पुढील साहित्य लेखनास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी बिडकीन ग्राम पंचायतीचे माजी सदस्य फेरोजभाई सय्यद यांनीसुध्दा अय्युब पठाणचा पुष्पहार देऊन सत्कार केला आहे. यावेळी जफरखान पठाण, शुभम केंद्रे, मुदस्सर पठाण समीर शेख, मोईन पठाण आणि परिसरातील गावककरी हे मोठ्या संख्येने सत्काराच्या कार्यक्रमाला हजर होते. शेवटी सर्वांनी चहापाणी घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.






## विधवा, परित्यक्ता सौभाग्यवती, बुद्धिस्ट, मुस्लिम महिलांनी वटवृक्ष लावून केला वटसावित्री सण साजरा



**उमरगा (भुमीपुत्र वाघ) :** (हीच पत्नी पुन्हा पुन्हा मिळो म्हणून पुरुषानी केली निसर्ग देवतेला प्रार्थना.) येथील समाज विकास संस्था, उमरगा शहरातील मित्रपरिवार, वृक्षप्रेमी,मॉर्निंग वॉक मधील सर्व सदस्य मित्रगण यांच्या सर्वांच्या सहभागातून उमरगा धाराशिव जिल्ह्यामध्ये वडाची रोपे लावून वटपौर्णिमा सण साजरा केला.जगात वेगळेपण सिद्ध करण्यासाठी महिला सरसावल्या आहेत. हा सण फक्त सौभाग्यवतीचा नाही तर तो दिन दलित, उपेक्षित, विधवा परित्याक्ता,मुस्लिम, बुद्धिस्ट, ख्रिश्चन या सर्व समाजातील महिलांचा सण आहे.कारण झाडे असतील तरी पृथ्वी सुंदर दिसणार आहे.अगर पृथ्वीवर एकही झाड नसेल तर ही पृथ्वी जळून खाक होईल. जीव एकही शिल्लक राहणार नाही.म्हणून झाड हे महत्त्वाच आहे. झाडाला जात नसते, धर्म नसतो, वंश नसते,झाड हे झाड असतं.ते आपल्यासाठी असतं म्हणून समाज विकास संस्थेने वेगळा पायंडा जगाला दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. विविध समाजातील महिलांनी एकत्र येऊन शिवपुरी रोडला वडांची झाडे लावून हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. झाडाची पूजा केली. झाडाला पाणी घातलं आणि या जगातल्या सर्व मानव जातीला रोगापासून मुक्त जीवन जगण्यासाठी,आनंदात जीवन जगण्यासाठी निसर्गातल्या सर्व शक्तींना प्रार्थना केली. या कार्यक्रमाचे आयोजन समाज विकास संस्थाचे कार्यवाह भूमिपुत्र वाघ, अनाथाची,गरिबांची माय विद्याताई वाघ, यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील साहित्यिक वर्षा भगवान असोले, सुनंदा प्रल्हाद वांझाळ, रामभाऊ पतंगे, इंजिनीयर किसन बाबरे, माझी पीएसआय बळवंत जमादार साहेब,महानंदा जमादार,लता नागदे, सुलक्षणा जामगे, फॉरेस्ट विभागाच्या माजी विभाग प्रमुख प्रमिला सूर्यवंशी मॅडम, मंजू पतंगे, ज्योतीताई पतंगे, प्रियंका पंढरपुरे प्रतिक्षा पंढरपूरे आणि विठ्ठल रुक्मिणी मंदिर कार्यकारी मंडळाच्या भगिनींनी या कार्यक्रमाचे आयोजन केलं होतं. या जगावेगळ्या महोत्सवाला उमरगा तालुक्यातील विविध गावातून शिवपुरी,ब्रह्मपुरी, विष्णुपुरी, जिजाऊ चौक, परिसरातील मोठ्या संख्येने महिला पुरुष महिला सहभागी झाले होते.

## कोथळी येथील प्रतिभा निकेतन विद्यालयास रोटरी क्लबकडून स्मार्ट टीव्ही भेट



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी आणि त्यांचे शिक्षण अधिक प्रभावी व्हावे, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ मुरूम सिटीच्या वतीने कोथळी येथील प्रतिभा निकेतन विद्यालयास 'स्मार्ट टीव्ही' भेट देण्यात आला.

या उपक्रमाचे उद्घाटन मंगळवारी ( ता. 30) कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बसवराज पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बसवराज पाटील होते. प्रारंभी कै. माधवराव (काका) पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, सचिव कलाप्पा पाटील, माजी अध्यक्ष गोविंद पाटील, डॉ. नितीन डागा, प्रा. डॉ. महेश मोटे, उपसरपंच बाबासाहेब पाटील, नूतन अध्यक्ष कलय्या स्वामी, कोषाध्यक्ष प्रकाश रोडगे, मुख्याध्यापक इरफान मुजावर, पालक मल्लिनाथ बिराजदार, हनुमंत आपचे, बिभीषण कांबळे, पौर्णिमा कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शाळेतील शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या समर्थ बिराजदार, समीक्षा कांबळे, प्राजक्ता स्वामी, अस्मिता आलेगावे, प्रज्ञा कांबळे, गणेश जमादार, मल्लिकार्जुन बिराजदार, रितेश कांबळे, भाग्येश कट्टेपुरे, ओमकार पाटील, समर्थ बेळवडे, शिवानंद स्वामी, लक्ष्मण बंदीछोडे, इब्राहिम मकानदार, अमिना शेख या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते शालेय साहित्य देऊन गौरव करण्यात आला. आपल्या मनोगतात डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी म्हणाले की, आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी डिजिटल साधनांचा वापर करून आपले ज्ञान अद्ययावत ठेवावे. भविष्यात विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षेत यश मिळवण्यासाठी या स्मार्ट टीव्हीचा मोठा फायदा होईल. यावेळी गोविंद पाटील, डॉ. नितीन डागा, डॉ. महेश मोटे यांनी रोटरी क्लबच्या कार्याचा आढावा घेत या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक इरफान मुजावर यांनी केले. सूत्रसंचालन बाळासाहेब सोनकटले यांनी केले तर आभार रवींद्र सुरवसे यांनी मानले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अविनाश गुरव, नंदू आपचे आणि रवी गावडे यांनी विशेष पुढाकार घेतला. फोटो ओळ : कोथळी, ता. उमरगा येथील प्रतिभा निकेतन विद्यालयात रोटरी क्लब मुरूम सिटी च्या वतीने स्मार्ट टीव्ही व शालेय साहित्य वाटप करताना मान्यवरांसह शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी.

## जंगलाचा राजा

सिंहमहाराज सिंहमहाराज
जंगलात तुमचा दरारा
गर्जनेने दणाणतो
आसमंत सारा

मानेभोवती केसांचे
शोभून दिसते आयाळ
लहान मोठ्या प्राण्यांना
पंज्याने करता घायाळ

चाल तुमची डौलदार
शूर व बलवान
तावडीत सापडलेल्यांना
नसे कधीच जीवदान

तृणभक्षी प्राण्यांचे मांस
आवडे तुम्हा फार
पाठलाग त्यांचा करतांना
नसे कधीच माघार

धाडस व शौर्याचा
जंगलात गाजा वाजा
म्हणून झालात का
जंगलाचा राजा?




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106


## दोरा बांधून वडाला

वड म्हणाले बाईला,
बाई एक झाड लाव!
पर्यावरणाची रक्षा,
करण्यास आता धाव.

दोरा बांधून वडाला,
कसे आयुष्य वाढेल.
दोरा बांधता बांधता,
जीव वडाचे काढेल.

वटपौर्णिमेला सखी,
दरवर्षी लाव झाड.
तुझा करेल नवरा,
जगतांना रोज लाड.

फांदी वडाचे तोडून,
कुठे आनंद मिळेल.
झाड वडाचे लावता.
प्रदूषण दूर पळेल.

वटपौर्णिमेला बाई,
फिरू नको गोलगोल.
झाडे लावून जपावे,
निसर्गाला अनमोल.




**नागेश बोंतेवाड,**
छत्रपती संभाजीनगर


## संगीताच्या सुरांतून उलगडले संत कबीरांचे जीवनदर्शन



**जालना, (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे)** : महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीच्या सहकार्याने हिंदी आंदोलन परिवार, पुणे, राय लक्ष्मणप्रसाद बैजल ट्रस्ट, जालना, हिंदी विभाग, जे.ई.एस. महाविद्यालय, जालना आणि कलावर्धिनी, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने संत कबीर जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेला 'बहता समीर, गाता कबीर' हा वैशिष्ट्यपूर्ण संगीतमय कार्यक्रम सोमवारी सायंकाळी जे.ई.एस. महाविद्यालयाच्या चुन्नीलालजी गोयल सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.'क्षितिज' निर्मित या कार्यक्रमाचे लेखक, दिग्दर्शक आणि सूत्रधार संजय भारद्वाज यांनी आपल्या सहकलाकारांसह संत कबीरांच्या जीवनदर्शनाचा, अध्यात्माचा आणि सामाजिक विचारांचा सुरेल आविष्कार रसिकांसमोर साकारला. संगीत, निवेदन आणि नाट्यमय सादरीकरणाच्या प्रभावी संगमातून कबीरांच्या वाणीतील समता, मानवता, प्रेम, बंधुता आणि सामाजिक प्रबोधनाचा संदेश अत्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आला.कार्यक्रमादरम्यान "मोको कहाँ ढूँढ़े रे बन्दे", "झीनी-झीनी बीनी चदरिया", "माला फेरत जुग भया" आणि "पोथी पढ़ि पढ़ि जग मुआ" यांसारख्या संत कबीरांच्या कालजयी पदांचे भावपूर्ण सादरीकरण करण्यात आले. प्रत्येक पदाचा आशय, त्यामागील तत्वज्ञान, गेयता, संगीतात्मकता आणि उपदेशात्मक मूल्ये यांचे रसग्रहण संजय भारद्वाज यांनी प्रभावी निवेदनातून करून दिले. कबीरांचे काव्य हे केवळ साहित्य नसून मानवतेचा, आत्मबोधाचा आणि सामाजिक परिवर्तनाचा शाश्वत संदेश असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे उद्‌घाटन राय लक्ष्मणप्रसाद बैजल ट्रस्टचे अध्यक्ष शिवकुमार बैजल आणि ज्येष्ठ लेखिका रेखा बैजल यांच्या शुभहस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जे.ई.एस. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते. महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचे ज्ञानेश्वर भालेराव आणि कलावर्धिनीचे डॉ. यशवंत सोनुने यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागप्रमुख डॉ. नानासाहेब गोरे यांनी केले, तर डॉ. प्रवीण चंदनशिवे यांनी उपस्थितांचे आभार मानले.संत कबीरांच्या समता, बंधुता, प्रेम, मानवता आणि सर्वधर्मसमभावाच्या विचारांना संगीताची साथ लाभल्याने संपूर्ण कार्यक्रमाने उपस्थितांच्या मनावर अमिट छाप पाडली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ॲड. विष्णुपंत नाईक, डॉ. प्रवीण चंदनशिवे, डॉ. मानसी लोखंडे, डॉ. सुजाता रगडे, प्रा. किशोर खरात तसेच आयोजन समितीतील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता कबीरांच्या विश्वबंधुत्व आणि सामाजिक समरसतेच्या संदेशाने भारलेल्या वातावरणात झाली.






## प्रा.डॉ.रमेश मादळे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा




**उमरगा : (प्रा.नागसेन कांबळे)** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात 32 वर्षापासून कार्यरत असलेले विद्यार्थीप्रिय शिक्षक प्रा. डॉ. रमेश मादळे हे आपल्या प्रदीर्घ अध्यापन सेवेनंतर आज विहित वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या शैक्षणिक, संशोधनात्मक आणि प्रशासनिक कार्यामुळे महाविद्यालयाच्या विकासात त्यांचे अमूल्य योगदान आहे, त्यामुळे संस्था व महाविद्यालयाच्या वतीने त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर तात्या हिरवे हे उपस्थित होते. उपाध्यक्ष व अध्यक्षांच्या हस्ते प्रथमता प्रा. डॉ . रमेश मांदळे यांच्या आईचा सत्कार झाला. त्यानंतर प्रा. डॉ.रमेश मादळे यांचा यथोचित सत्कार झाला. यावेळी बोलताना "ते एक उत्तम प्राध्यापक म्हणून व माणूस म्हणूनही उत्तमच होते. अत्यंत संयमी, शांत, सहनशील असा त्यांचा स्वभाव होता. मौन सर्व साधनम ही उक्ती त्यांना कायम लागू पडत होती. साक्षेपी आणि लवचिक स्वभावाचा माणूस म्हणून त्यांचा नावलौकिक होता. सुरुवातीला आम्ही दोघांनी एकत्रितच मुलाखत दिली असून अनेक वर्ष एकत्रितपणे काम केले आहे.त्यामुळे त्यांचा मला अत्यंत जवळून परिचय आहे "असे संबोधून प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांनी त्यांच्या प्रदीर्घ सेवेचे कौतुक करत यापुढील भावी आणि निरोगी आयुष्यासाठी व पुढील वाटचालीसाठी मनपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रा. आर. एन. निगडे, प्रा. डॉ. ए. सी. गायकवाड आणि इतर अनेक सहकाऱ्यांनी त्यांच्या विषयी समुचित मनोगते व्यक्त करत दीर्घायुष्यासाठी मंगल कामना व्यक्त केल्या. आपण दिलेले सहकार्य आणि प्रेम मी आयुष्यभर माझ्या हृदयात कायम आठवणीत ठेवत, जेव्हा माझी गरज वाटेल तेव्हा कधीही मी आपल्या सेवेत उपलब्ध असेन असे अभिवाचन देत प्रा. डॉ. रमेश मादळे यांनी सत्काराला उत्तर दिले. प्रा. डॉ. मल्लमा आंबुसे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व प्रा. डॉ. डी. पी. बॉस चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,नातेवाईक आप्तस्वकीय व विद्यार्थी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ जुलै २०२६


# कविता विशीतल्या आणि मिशीतल्या: मिस्किल मर्मग्राही आस्वादक कविता




मधुकर जाधव मु.उमरद ता शिंदखेड राजा.यांची कविता ही तुकोबांची भाषा बोलते.नाठाळाच्या पाठी काठी घालणारी कविता.ही कविता खरी बोलते सत्याची कास धरते.कुठेही प्रतिमा प्रतिकातून ती बोलत नाही.एक घाव चारपाच तुकडे होऊ द्या ! बोलतो आम्ही रोकडे कवितेतूनी.आखिल भारतीय साहित्य मंचावर त्यांनी 'थँक्स तुकोबा' ही कविता सादर केली.रसिकांनी निर्लेप दाद दिली.हा कवी कुळाचा सन्मान सातारा येथे मिळाला याचा मी साक्षीदार आहे.उरळी कांचन पुणे येथील प्रथम पुरस्कार 'थँक्स तुकोबा! हा मानाचा सन्मान या कवितेला आहे.कविता कशी हलकीफुलकी खुशखुशीत मनोरंजनातून आली की,मनाचा हळूवार कप्पा उलगडून जातो आणि कवीचा शालेय व महाविद्यालयीन मोहर फुलून जातो.कविता खोल मनाचा तळ ढवळून काढते.हे हलकं फुलकं लिहत कवी जेव्हा खोल आत्मिक आंतरिक भाव उलगडून दाखवतो.आई बापाचे सल ते राजमाता जिजाऊ माँ साहेब , सावित्रीमाई,तुकोबा यांच्या विषयीची कृतज्ञता तेव्हा मन पिळवटून निघते तशी ही कविता विशीतू मिशीत केंव्हा येते कळत नाही.खरचं ही कविता वाचल्यावर मनाचा तळं ढवळून निघतो.मी या कवितेचा मर्मग्राही आस्वादक अनुबंध बांधतो.आई वडीलांची पुण्याई आहे म्हणून "कष्टाळू वडील आणि मायाळू आई यांच्या माझ्या अस्तित्वाला.."ही सविनय अर्पणपत्रिका.साहित्य अकादमी पुरस्कार विजेते कवीवर्य श्रीकांत देशमुख पाठराखण करताना लिहितात "थोडी समज आल्यावर आपण आपल्या बरोबरच आपल्या समाजाचाही विचार करू लागतो.आपला भोवताल निरखू लागतो.कवीलाही असेच बरेच काही दिसते.शेतीव्यवस्था,देश, समाज या सगळ्या सामाजिक पर्यावरणाचा विचार हा देखील जाधव यांच्या आस्थेचा विषय आहे.आपला बाप,आई,जिजाऊ माँ साहेब, तुकोबा या सगळ्यांशी कवी संवाद साधताना दिसतो.एक भला समाज निर्माण व्हावा यासाठी कवी काही बोलू पाहतो आहे.त्यांच्या अभिव्यक्तीमध्ये नवेपणाच्या खुणा दिसत असल्या तरी भूमिका मात्र परिपक्व अशी आहे."ही चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक पाठराखण कवीच्या मनोभूमिकेला समर्थ आशिष देऊन जाते.साहित्य अकादमी पुरस्कारविजेते श्रीकांत देशमुख साहेब पाठराखण लिहितात "थोडी समज आल्यावर आपण आपल्याबरोबरच समाजाचाही विचार करू लागतो.आपला भोवताल निरखू लागतो कविलाही बरेच काही दिसते.शेतीव्यवस्था,देश, समाज, या सगळ्या सामाजिक पर्यावरणाचा विचार हा देखील जाधव यांच्या आस्थेचा विषय आहे.आपला बाप,आई, जिजाऊ माँ साहेब, तुकोबा या सगळ्यांशी कवी संवाद साधताना दिसतो.एक मला समाज निर्माण व्हावा यासाठी कवी काही बोलू पाहतो आहे "(ब्लर्ब)ही आशयघन पाठराखण.प्रस्तुत कविता मिशीतल्या जणू विशीतल्या वास्तवातल्या अंगावर शहारे देऊन जाणाऱ्या.वयापरत्वे,धन्यजिजामाई, बळीराजा, दुष्काळ, अभिजात,माय, घ्या जन्म पुन्हा शिवराय,जावे त्यांच्या वंशा, साहेब,असं वाटतं, भीमराव या सर्वव्यापी कवितेचा मर्मग्राही आस्वादक घेतला तर हे आपल्या पुर्वजांचे आत्मिक अधिष्ठानाची ही कविता ऋणाई व्यक्त करते.'भीमराव'अभंग रचनेत कविता अशीविद्येचा व्यासंगा।छंद वाचनाचा।सन्मान देशाचा।वाढविला!न्याय समता नि।बंधुभाव पाळा।संघर्ष टाळा।आपसात!ज्ञानी विश्वरत्न। बोधीसत्व झाला हदयी बसला।भीमराव।....(पृ.66)या कवितेने समकालीन व्यापकता, जिजाऊंदिली आहे.कारण शिक्षण मिळाले व नवी दृष्टी मिळाली जी केवळ मायबाप,शेती माती,गाव शिवार यातील माणूसकीचा गहिवर ही कविता देऊन जाते.तुकोबाची गाथा,बाबासाहेबांची लेखनीच्या संस्कार शिदोरीची गौरव गाथा गाणारी ही कविता आहे.म्हणून या कवितेचा तोंडावळा म्हणजे चला भान आलंय जाणं घेऊन जगा.आपल्या गावं खेड्यातील मायमातीची मुठभर माती कपाळी लावून ही नाळ या कवितेत बांधली आहे. ही माणूसपण शोधणारी ही कविता आहे.जे आज हरवत चालले आहे.व्यवस्थेचा बळी,युज अँन्ड थ्रो, व्यवस्था हद्दपार होईल, गलितगात्र,थाॅट पार्लर, तरीही आम्ही गप्प बसायचं?, कठीण वज्रास भेदू कैसे? जयभीम जय शिवराय ही या कवितेची खरी ओळख झाली आहे ज्या शिक्षणप्रेमी ली मधून ही व्यवस्था भरडूननिघत आहे.कवीच्या चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक्तेचा अनुबंध या कवितेतून दिसून येतो.जसे,"चोर मिरवती उजळ माथ्याने शाहू ठरविले जाताहेत चोर...माणुसकी रसातळाला जाण्यापासून रोखता आम्हाला येईल काय?तरच म्हणता येईल,जय भीम..जय शिवराय"..(पृ.112)या समकालीन वास्तवाची प्रखर ठणक या कवितेने उजागर केली आहे.या वाड्मयीन परिप्रेक्ष्यात डोळसपणे पाह्यले तर अतिशय निर्मळ निर्लेप अंतःकरणाने ही कविता मुक्तपणे माणूस म्हणून व्यक्त होते.आम्ही कुठवर गप्प बसायचं? गळून गेले हाडकं अन् कंबर कधी कसायचं?ही खुळचट लाळघोटी व्यवस्था आहे या कठीण व्रजव्यवस्थेस भेदण्याची ताकद या कवितेने ठाम मांडली आहे.आज तुकोबांची अभंग गाथा आणि महात्मा फुले यांचे अखंड हेव्रजालाही भेदणारे भेदीक होते.तशी मनोमन काव्याची धारधार निर्धार करणारी ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल वर्तमानची ठणक देऊन जाते.जसे, तुकोबा!"असाध्य ते साध्य करण्या/अभ्यास करा तुका म्हणे/असं म्हणायची सोय राहिली नाही कारण ऐकणारा सहज परतवतो सल्ला गांभिर्य लक्षात न घेता/तुको म्हणे तर म्हणू दे!...तू का म्हणे?अशी हेटाळणी करून.(पृ.114) असे हे मन पिळवटून टाकणारे व वास्तवाची मांडणी करणारी ही कविता आहे.साहित्यअभ्यासक वक्ते डॉ भगवान खरात सर आपल्या प्रस्तावनेत लिहितात "भाष्याभ्यासाच्या दृष्टीकोनातून सुध्दा जाधव यांची कविता प्रतिमाप्रचूर व प्रतिभावंत ठरते.अभंग,गझल सदृश्य,हायकू,व मुक्तछंद अशा विविध छंद व वृत्तांनी नटलेली आणि सोबतचं आशयाची घनता सांभाळून सुध्दा सहजगम्य अशी ही कविता आहे.एकूनच प्रेम भावनेकडे निकोप व निसंकोच दृष्टीकोनातून बघणारी सामाजिक प्रश्नांची जाण असणारी शिवाराशी नाते जपताना आधुनिकीकरणाच्या नावाखाली फोपावू पाहणाऱ्या कुप्रवृत्तीवर आसूड ओढत ही कविता निभिड भाष्य करते"(प्रस्तावना) अतिशय चिंतन आशय संपन्न सृजन समर्पक विवेचन हे या कवितेचे श्रेयस आहे.कविता विशीतल्या ही कवीमनाची भावविभोरता जरी असली तरी आपल्या सृजनशील संस्काराने मातीशी इमान घेऊन नाळ कधीचं न तूटू देता.प्रेमाच्या अलवार खपलीकडे कवी एक मिस्किल भावनेने पाहतो.ते म्हणजे प्रेम हा भाबडा आशावाद आहे.स्वप्न,एक गोरी,रूपवती, तुझ्या वेणीचा गजरा, प्रियतमा,पुष्पीन एकदा,पानवलेल्या डोळ्यांमध्ये,मन तुझ्यावर, चंद्र होता साक्षीला,मी ही केलं होतं प्रेम,जीव ओतून, आता नाही बोलणार,या संपूर्ण कविता महाविद्यालयीन युवक युवतींच्या भावकल्लोळाचा आरसा आहे.क्षणभर मनाचे फुलपाखरू होणे.कधी मनाचा धुंवाधार पाऊस होणे तर कधी अनंत अंथागाचा थांग शोधने पण पुन्हा आपल्या खडतर संघर्षाची कहाणी माय बापाच्या तळहातावरच्या फोडाची व उपकाराची जाणीव होणे हे श्रेष्ठत्व या कवितेने दिले आहे.म्हणून भावनेच्या काटेरी उनग्यावर ही कविता जळत नाही.आई,प्रवृत्ती,तरूणाई या कवितेचा "व्यसनांध पिढी।रमे स्वतःतसंस्काराची बाता।नुरे आता! तरुणाई धावे।मृगजळापाठी।वास्तवाची काठी। द्यावे टोले!(पृ.83)असे प्रखर भाष्य ही कविता करते.अभिव्यक्त होताना डॉ मधुकर जाधव सर लिहितात "मन, समाज, समाजसुधारक,देश या बाबतीत निरिक्षणाच्या आधारे माझे मत बनत गेले,तसे मी 'मिशीतल्या कविता'या भागांमध्ये काव्यरूप दिले आहे.कविता लिहिणे ही निसर्गतः देणगी असते की,ती सरावाने व अभ्यासाने अंगी बनवता येते.माझ्या मनातील आई- वडीलांप्रती, समाजसुधारकांप्रत्ती असलेला आदरभाव सभोवतालच्या घटकांविषयीची तळमळ मला कवितेद्वारे मांडता आली.यात मी धन्यता मानतो"(पृ.16)कवीवर्य साक्षेपी समीक्षक निवेदक संशोधक डॉ मधुकर जाधव यांची कवितेची सृजनशील वाटचाल अतिशय नितळ निर्लेप निस्पृह श्रध्देची आहे.अरविंद शेलार यांचे मुखपृष्ठ आशय संपन्न सृजन समर्पक आहे.तर प्रा.प्रशांतकुमार डोंगरदिवे यांची रेखाटने अतिशय आशय संपन्न झाले आहेत.कवीस्नेही मनस्वी हार्दिक शुभेच्छा.महाविद्यालयीन वाचकांनी आवर्जून वाचावा अशा 'कविता-विशीतल्या आणि मिशीतल्या'

पुस्तकाचे नांव:-कविता विशीतल्या आणि मिशीतल्या
लेखक:-कवी मधुकर बालासाहेब जाधव
प्रकाशक:-परिस पब्लिकेशन, पुणे
प्रथमावृती:-14 मे 2024
मुखपृष्ठ:-अरविंद शेलार रेखाटने:- प्रा प्रशांतकुमार डोंगरदिवे मूल्य:-170/रूपये



**परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ जुलै २०२६


## सुखनाकाठचा लढवय्या भूमिपुत्र : डॉ. शिवाजी हुसे



जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातून वाहणारी सुखना नदी. कधी कोरडी पडणारी, कधी पुरात थैमान घालणारी. या नदीच्या काठावरचं देशगव्हाण गाव आणि याच मातीत जन्माला आलेला एक विचारवंत म्हणजे डॉ. शिवाजी हुसे. ते केवळ नाव नाहीत, तर सुखनाकाठच्या शेतकऱ्यांच्या वेदनेला वाचा फोडणारा आवाज आहेत.देशगव्हाणच्या माळरानावर त्यांचं बालपण गेलं. शेती, दुष्काळ, पाणीटंचाई, बापाची चिंताग्रस्त मुद्रा आणि आईच्या कष्टाळू हातांनी त्यांच्या मनावर खोल संस्कार केले. सुखना नदी बारमाही वाहावी आणि शेतकऱ्याच्या बांधापर्यंत पाणी पोहोचावं, हे स्वप्न त्यांनी लहानपणापासून पाहिलं. शाळेत असतानाच वाचन आणि लेखनाची आवड निर्माण झाली आणि सामाजिक विषमतेविरुद्धची चीड त्यांच्या शब्दांतून व्यक्त होऊ लागली.घरची परिस्थिती बेताची असतानाही जिद्दीने त्यांनी उच्च शिक्षण पूर्ण केलं. साहित्य, समाजशास्त्र आणि पत्रकारितेचा अभ्यास करताना ग्रामीण जीवनाचे प्रश्न त्यांनी मुळापासून समजून घेतले. छत्रपती शिवरायांचा रयतेच्या कल्याणाचा दृष्टिकोन, महात्मा जोतिराव फुले यांचा सत्यशोधक विचार आणि शिक्षणाचा आग्रह, साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांची शोषितांच्या व्यथेला दिलेली शब्दांची धार, संत गाडगे बाबांचा 'गाव स्वच्छ तर मन स्वच्छ' हा कृतीशील संदेश, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मंत्र आणि संत भगवान बाबांचा भक्ती-शक्ती-युक्तीचा समन्वय या महापुरुषांच्या विचारांनी त्यांची वैचारिक जडणघडण केली. पीएच.डी. मिळवून ते डॉक्टर झाले, पण पदवीने त्यांना मातीपासून तोडलं नाही, उलट नातं अधिक घट्ट केलं.डॉ. शिवाजी हुसे हे केवळ लेखक किंवा आंदोलक नाहीत, तर बहुआयामी नेतृत्व आहेत. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राज्य प्रवक्ते म्हणून त्यांनी राज्यभर शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. कापूस, सोयाबीनचा भाव, पीकविमा आणि कर्जमुक्तीच्या लढ्यात त्यांचा आवाज बुलंद राहिला. मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी मातृभाषा आणि मराठी साहित्याच्या संवर्धनासाठी योगदान दिलं. गावगाडा, शेती, पाणी आणि नदी प्रश्नांचे अभ्यासक आणि कृतिशील कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. उत्तम वक्ते म्हणून हजारो श्रोत्यांना ते भारावून टाकतात. त्यांच्या भाषणात इतिहासाचे दाखले, साहित्यिक संदर्भ, संतवाङ्मयाचे उल्लेख आणि शेतकऱ्याच्या वेदनेची आर्तता असते.शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आणि उपेक्षित, दुर्लक्षित लेखकांना व्यासपीठ देण्यासाठी त्यांनी त्रैमासिक तिफण' हे नियतकालिक सुरू केलं. संपादक म्हणून त्यांनी ते महाराष्ट्रातील एक महत्त्वाचं वैचारिक व्यासपीठ बनवलं. अण्णा भाऊ साठे यांच्यासारखी परखड भाषा वापरून बोगस बियाणे, कापसाचा भाव, पीकविमा, अवैध वाळू उपसा, पाझर तलावांची दुरवस्था यांसारखे ज्वलंत विषय त्यांनी मांडले. ग्रामीण जीवन, शेती, पाणी आणि सामाजिक चळवळींवर त्यांची अनेक पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या लेखनातून छत्रपती शिवरायांचा रयतेचा कळवळा, महात्मा फुले यांची चिकित्सा, अण्णा भाऊ साठे यांची विद्रोहाची धार, डॉ. आंबेडकरांचा संघर्ष, संत गाडगे बाबांची स्वच्छतेची तळमळ आणि संत भगवान बाबांची भक्ती यांचा संगम दिसतो.लेखणीबरोबरच कृतीवरही त्यांचा विश्वास आहे. संत गाडगे बाबांप्रमाणे कृतीशीलतेला महत्त्व देत 'सुखना बचाओ जन आंदोलन संघर्ष समिती'च्या माध्यमातून त्यांनी जल, जंगल, जमीन या मुद्द्यांवर जनआंदोलन उभं केलं. छत्रपती शिवरायांच्या रयतेच्या राज्याची संकल्पना आणि 'गाव तिथे शिवार, शिवार तिथे सरकार' या तत्त्वाला धरून त्यांनी 'शिवार संसद' ही अभिनव संकल्पना मांडली. या संसदेत शेतकरी थेट प्रश्न मांडतात आणि ठराव मंजूर करतात. अवैध वाळू उपशाविरुद्ध, पाझर तलावाच्या दुरुस्तीसाठी आणि कालव्याच्या पाण्यासाठी त्यांनी प्रसंगी रस्त्यावर उतरून संघर्ष केला आणि प्रशासनाला जाब विचारला. केवळ आंदोलन न करता त्यांनी गावातील युवकांना एकत्र करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं आणि 'शिवरायांसारखे स्वाभिमान जपा, महात्मा फुलेंसारखे शिका, अण्णा भाऊंसारखे लढा' हा संदेश दिला.मोठ्या शहरात स्थायिक होण्याची संधी असतानाही त्यांनी सुखनाकाठची नाळ तोडली नाही. कारण त्यांना माहीत आहे की 'डॉक्टर' ही पदवी पुस्तकांतून मिळते, पण 'भूमिपुत्र' ही ओळख काळजातल्या मातीतून आणि महापुरुषांच्या विचारातून मिळते. आजही ते ज्ञानदानाबरोबर सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी यांच्या प्रश्नांवर ते सातत्याने काम करतात आणि त्यांच्या घराची दारं सर्वांसाठी उघडी असतात.डॉ. शिवाजी हुसे हे केवळ व्यक्ती नाहीत, तर छत्रपती शिवराय, महात्मा फुले, अण्णा भाऊ साठे, संत गाडगे बाबा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत भगवान बाबा यांच्या विचारांचा वारसा जपणारी एक चळवळ आहेत. सुखना नदीप्रमाणे अडथळ्यांना वळसा घालून पुढे जाण्याची जिद्द त्यांच्यात आहे. त्यांचा श्वास आहे शेतकरी, त्यांची ओळख आहे सुखनाकाठ, आणि त्यांचं ध्येय आहे महापुरुषांच्या विचारांवर आधारित समताधिष्ठित, जलसमृद्ध बलशाली गाव निर्माण करणं. जोपर्यंत सुखना वाहते आहे, तोपर्यंत या भूमिपुत्राचा लढा सुरूच राहणार आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा !

**- उज्ज्वला कोंडके,**
छत्रपती संभाजीनगर

## तिफण डिजिटल तर्फे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर 'लोक-अदालती'चे आयोजन

**कन्नड** : त्रैमासिक 'तिफण' हे महत्वाचे वाङ्मयीन नियतकालिक असून आता 'तिफण डिजिटल'च्या माध्यमातून विविध विषय घेऊन चर्चा घडवून आणणार आहोत. बदलत्या काळानुसार प्रिंट स्वरूपाबरोबरच तिफणचे डिजिटल माध्यमही आता नव्या स्वरूपात सक्रिय करण्याचा मानस असून या माध्यमातून ग्रामीण समाज, संस्कृती, लोकभाषा, लोकजीवन, लोककला, नदी, पाणी, पर्यावरण, वंचितांचे प्रश्न ,शेतीचे प्रश्न आणि बदलता गावगाडा, सण-उत्सव, यात्रा यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे. अशी माहिती 'तिफण डिजिटल'चे संपादक डॉ. शिवाजी हुसे यांनी दिली आहे.'लोक-अदालत' उपक्रमाबद्दल:'तिफण डिजिटल'च्या नावीन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात 'तिफण लोक-अदालत' या लाईव्ह चर्चासत्राने होत आहे. गावाच्या चावडीवरची चर्चा आता डिजिटलवर घेऊन येत आहोत.डॉ. शिवाजी हुसे पुढे म्हणाले:"'तिफण' ही केवळ नियतकालिक किंवा चॅनल नसून ती ग्रामीण संवेदनेची चळवळ आहे. 'लोक-अदालत'च्या माध्यमातून आम्ही प्रश्नांना थेट भिडणार आहोत. इथे राजकारण नसेल, फक्त संवाद आणि उपाय असेल."लवकरच एक विषय व पुढील रूपरेषा जाहीर करू. ही लोक अदालत प्रत्येक महिन्यात होणार आहे. वर्षभरात विविध विषयावर चर्चा घडवून उपाय ही सुचविले जाणार आहेत.

## चौका गाव वाचवण्यासाठी ग्रामस्थ सरसावले; महामार्ग १००० मीटर दूर नेण्याची मागणी



**छत्रपती संभाजीनगर** : प्रस्तावित खानदेश एक्सप्रेस महामार्गामुळे चौका गावातील शेतजमीन, घरे व व्यवसायांना मोठा फटका बसणार असल्याने ग्रामस्थांनी आज 'जमीन बचाव कृती समिती'च्या नेतृत्वाखाली आक्रमक पवित्रा घेतला. चौका गावातील शेतकरी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने आज जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर आणि MSRDC कार्यालयात निवेदन सादर करून महामार्गाचे संरेखन गावापासून किमान १००० मीटर उजव्या बाजूस वळवण्याची मागणी केली. "विकासाला विरोध नाही, पण उध्वस्त करून नको" कृती समितीने स्पष्ट केले की, "आम्ही विकासाच्या विरोधात नाही. मात्र शेतकरी, घरे, व्यवसाय आणि गावाचे कमीत कमी नुकसान होईल, अशा पर्यायी मार्गाचीच आमची न्याय्य मागणी आहे. सध्याच्या संरेखनामुळे संपूर्ण गावाचे अस्तित्वच धोक्यात येईल."शिष्टमंडळात दिग्गजांचा सहभाग आजच्या शिष्टमंडळात माजी सभापती दगडूभाऊ वाघ, माजी सरपंच संतोष वाघ, माजी उपसरपंच व चेअरमन राजू वाघ, अशोक वाघ, डॉ. संतोष घालगे, अजिनाथ वाघ, दिनेश वाघ, रामभाऊ डोंगरे, दामू पैलवान वाघ, विलास डोंगरे, पंडित वाघ यांच्यासह चौका गावातील अनेक प्रमुख ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. "एकजूट, संयम, न्याय" हाच मंत्र 'एकजूट • संयम • न्याय हीच आपल्या लढ्याची खरी ताकद' असा निर्धार करत कृती समितीने पुढील काळात लोकशाही मार्गाने लढा तीव्र करण्याचा इशारा दिला आहे. MSRDC ने ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेऊन तातडीने सर्वेक्षण करावे व पर्यायी संरेखनाचा विचार करावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ जुलै २०२६

## लेकरांच्या चेहऱ्यावरचा आनंद हेच आमच्या कार्याचं समाधान - प्रा. सागर चाबुकस्वार



**छत्रपती संभाजीनगर :** आजही समाजात बरिच अशी विद्यार्थी आहेत. ज्यांना शिक्षणाची आवड आहे, शिक्षणाची तीव्र इच्छा आहे. परंतु, आर्थिक परिस्थिती अभावी आजही बऱ्याच ठिकाणी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहे. ज्यांचे आई - वडील दोघेही रोजंदारीवर काम करून लेकरांना शिकवतात. अशी देखिल विद्यार्थी आहेत. आज जर कामाला गेले तर त्यांना संध्याकाळची भाकरी मिळते. अशा घरातील विद्यार्थ्यांना आपण बळ देणे फार गरजेचे आहे. या विद्यार्थ्यांना जेव्हा हे शालेय साहित्य भेटल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर जो आनंद असतो.हा आनंद आम्हाला हे कार्य करण्याची ऊर्जा निर्माण करते.याच विचारातून गरजू विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी त्यांचा पंखांना भरारी मिळावी. या विचाराने एम. एस. डबल्यु. फाऊंडेशन अंतर्गत 'उडान' या उपक्रमाच्या माध्यमातून अशा होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांची मदत या माध्यमातून केली जात आहे. आतापर्यंत १०० विद्यार्थ्यांपर्यंत ही मदत पोहचली आहे आणि वर्षभरात १००० विद्यार्थ्यांपर्यंत ही मदत पोहोचण्याचा मानस आहे. असे प्रतिपादन एम.एस.डबल्यु. फाऊंडेशनचे संस्थापक प्रा. सागर चाबुकस्वार (मानसशास्त्रज्ञ) यांनी केले. उडान उपक्रमाअंतर्गत फाऊंडेशन तर्फे छत्रपती संभाजीनगर शहर व जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागात शालेय साहित्य हे विद्यार्थ्यांना वर्षभर पुरवल्या जाणार आहे. शालेय साहित्य वाटप करण्यासाठी मा.उत्तम राऊत (सहायक आयुक्त समाज कल्याण अधिकारी), विष्णू वाघमारे, संघपाल चाबुकस्वार, प्रविण किरवले, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सागर मगरे, सुरज चौरे (आरोग्य विभाग), सागर बहीरे हे मोलाचे सहकार्य देत आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून शालेय साहीत्यासोबतचं विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धा ज्यामध्ये कविता, लेख, चित्रकला, वाद - विवाद, इ., कौशल्य प्रशिक्षण, तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन, कम्युनिटी क्लासरूम (मोफत शिकवणी) कला प्रदर्शन, खेळ महोत्सव अशा विविध नावीन्यपूर्ण उपक्रम या माध्यमातून शालेय व त्याच बरोबर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणार आहेत. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी एक नवीन विचारमंच राहणार आहे. ज्यामुळे ते त्याचे कलागुण मुक्तपणे सादर करू शकतात.आजची पिढी ही इंटरनेटच्या आहारी जात आहे.अशा परिस्थितीत या विद्यार्थ्यांची ऊर्जा ही स्वत:ला घडवण्यामध्ये लागली पाहिजे. त्यासाठी हा उपक्रम विद्यार्थ्यांना स्मार्टफोन पासुन दूर तर ठेवलंच परंतु, त्याचबरोबर त्यांच्या कौशल्य विकासात देखिल मोठी भर पडणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते की , आपण या उपक्रमामध्ये सहभाग घ्यावा. असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात येत आहे. उडान या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. अजाबराव मनवर, अंकुश म्हस्के, ॲड.रवि ढिलपे, किशोर मगरे, प्रेम सपाटे, मोहन खंडागळे, आदी. परीश्रम घेत आहेत. या उपक्रमासाठी शक्य होईल ती मदत करण्याचे आवाहन एम. एस. डबल्यु. फाऊंडेशन तर्फे करण्यात येत आहे. आपल्या मदतीमुळे एखाद्याच भविष्य उज्ज्वल होण्यास मदत होऊ शकते

## काँग्रेस पार्टीच्या जिंतूर शहराध्यक्षपदी फिरोज भाई



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** काँग्रेस पार्टीच्या शहराध्यक्षपदी फिरोज भाई यांची एकमताने निवड करण्यात आली असून याबाबत परभणी काँग्रेसच्या ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाबाजानी दुर्राणी यांनी एक परिपत्रक काढून जितूर तालुक्यांची काँग्रेसची कार्यकारणी जाहीर केली असून त्यात शहराध्यक्षपदी फिरोज भाई यांची निवड केल्याचे कळवले आहे या निवडीबद्दल शहरातून काँग्रेस पार्टी कार्यकर्ते व पत्रकार मित्र मंडळ कडून त्यांची अभिनंदन होत आहे.

## संजय मडके यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्रा. व मा. वि. चिकलठाणा शाळेत शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक आदरणीय श्री. संजय मडके सर यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा आयोजित केला होता. या सोहळ्यासाठी मनपा केंद्रीय शाळा मुकुंदवाडी शाळेचे मु. अ. श्री. शिंदे प्रभाकर यांची उपस्थिती लाभली. तसेच शालेय समिती चिकलठाणा शाळेचे उपाध्यक्ष आदरणीय श्री. रामेश्वर कोरडे यांची उपस्थिती लाभली. श्रीम. अनुजा भिंगोले यांनी जीवन परिचय दिला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम. संगीता चव्हाण यांनी केले तर आभार श्री. जाहेद पठाण सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शालेय शिक्षक वृंद, विद्यार्थी तसेच सेवक वर्ग यांनी परिश्रम घेतले.

## जयभवानी महाविद्यालयात या विषयावर एकदिवशीय कार्यशाळा संपन्न!



**पाटोदा :** राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे विचार आजही समाजपरिवर्तनाचे दीपस्तंभ! असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी केले ते पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयात समाजशास्त्र विभागा आयोजित राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे सामाजिक व आर्थिक विचार या विषयावरील एकदिवशीय कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की सामाजिक न्याय, समता, शिक्षण, आरक्षण, स्त्री सक्षमीकरण आणि सर्व समावेशक विकास हा राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारातच आहे. तेव्हा युवकांनी समाज परिवर्तनासाठी शाहू महाराजांचे विचार आत्मसात करावेत!असे शेवठी त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यशाळेचे प्रस्ताविक समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. सुनिल जाधव यांनी केले. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सदाशीव सरकटे होते.प्रमुख वक्ते म्हणुन प्रा. सोमनाथ घाडगे,व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक हे होते. तर व्यासपीठावर विद्यापीठ अधिसभा सदस्या प्रा.डॉ.कल्पना घारगे ,कनिष्ठ विभागाचे प्रा.प्रकाश नाईकवाडे,प्रा.गोपाळ धांडे यांची उपस्थिती होती.प्रा.सोमनाथ घाडगे व प्रा.विनोद किर्दक यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शाहू महाराजांनी सामाजिक विषमता दूर करण्यासाठी केलेल्या ऐतिहासिक कार्याचा आढावा घेतला. त्यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानून सर्वसामान्य, बहुजन, शेतकरी, कामगार आणि वंचित घटकांसाठी अनेक लोकहितकारी निर्णय घेतल्याचे सांगितले.शाहू महाराजांनी मोफत व सक्तीच्या शिक्षणाला दिलेले प्रोत्साहन, स्त्रीशिक्षणासाठी केलेले प्रयत्न, सामाजिक समतेसाठी घेतलेले धाडसी निर्णय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी राबविलेल्या योजना आजही मार्गदर्शक असल्याचे वक्त्यांनी स्पष्ट केले. आधुनिक भारतात सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक बळकट करण्यासाठी शाहू महाराजांचे विचार प्रत्येकाने आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनीही सक्रिय सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. प्रश्नोत्तर सत्रात सामाजिक समता, आरक्षण, शिक्षणातील समान संधी आणि आर्थिक विकास या विषयांवर सखोल चर्चा झाली. विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व अधोरेखित करत समाजहितासाठी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात अध्यक्ष प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी राजर्षी शाहू महाराजांचे कार्य हे केवळ इतिहासातील सुवर्णपान नसून आधुनिक भारताच्या विकासाचा पाया असल्याचे सांगितले. समता, बंधुता, न्याय आणि मानवतेची मूल्ये जपण्यासाठी प्रत्येक युवकाने शाहू विचारांचा अभ्यास करून ते प्रत्यक्ष जीवनात उतरवावेत, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ. अशोक देवगुडे यांनी केले.तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. शिवाजी काकडे यांनी मानले. या कार्यशाळेस सर्व प्राध्यापक वृंद,व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ जुलै २०२६


# सिया लग्नाला थेट नाही का म्हणू शकली नाही? - चेतन भगत

पुण्यातील सिया गोयल-केतन अग्रवाल-चेतन चौधरी हे प्रकरण अत्यंत दुर्मिळ आणि टोकाचे आहे. ज्यांना हे माहिती नाही त्यांच्यासाठी: 20 वर्षांची सिया गोयल हिचा विवाह केतन अग्रवालसोबत ठरला होता (अरेंज्ड मॅरेज). मात्र, 18 जून रोजी पुण्याजवळील लोहगड किल्ल्यावर ट्रेकिंग दरम्यान, सिया आणि चेतनने कथितरीत्या केतनला किल्ल्यावरून ढकलून दिले, ज्यामुळे त्याचा मृत्यू झाला. हे सर्व पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार आहे. तपास जसजसा पुढे जाईल तसे सत्य समोर येईलच. जर कोणी केतनची हत्या केली असेल, तर ते कठोर शिक्षेस पात्र आहेत. परंतु हे विशिष्ट प्रकरण न्यायालय आणि पोलिसांत काय सिद्ध करेल ते करेल, पण यामुळे कोट्यवधी तरुण भारतीयांमध्ये एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा नक्कीच सुरू झाली आहे ती ही की, पालकांनी आपल्या सज्ञान मुलांच्या आयुष्यावर किती नियंत्रण ठेवावे? पोलिसांच्या म्हणण्यानुसार, सियाने लग्न मोडण्याचा उघड मार्ग निवडला नाही कारण तिला भीती होती की लग्न मोडल्यामुळे तिच्या पालकांची समाजात बदनामी होईल. ती इतकी द्विधा मनःस्थितीत आणि दबावाखाली होती की, तिने लग्न नाकारण्याऐवजी त्या मुलाचा जीव घेणे पसंत केले? या प्रकरणाने देशाचे इतके लक्ष वेधून घेण्याचे कारण म्हणजे, अनेक भारतीय कुटुंबे या मुख्य समस्येकडे डोळेझाक करतात. ती समस्या म्हणजे मुलांच्या आयुष्यावरील पालकांचे कधीही न संपणारे नियंत्रण. बिस्किटांच्या ब्रँडपासून ते मुलांच्या आयुष्यापर्यंत, पालक त्यांच्यासाठी प्रत्येक गोष्ट ठरवू इच्छितात. तुम्ही काय खाणार किंवा पिणार, कसे जगणार, काय कपडे घालणार, कोणाला भेटणार (कोणालाही नाही), प्रार्थना कशी करणार, तुम्ही कोणती नोकरी करणार, आम्ही (पालकांनी) निवडलेल्या व्यक्तीशीच तुम्ही लग्न करणार का (जात, समुदाय आणि धर्म या तीन घटकांच्या पडताळणीसह), तुम्ही कधी शारीरिक संबंध ठेवणार आणि कधी मुलांना जन्म देणार. यात जर मुलांकडून थोडी जरी चूक झाली, तर भावनिक ब्लॅकमेलिंगचे अस्त्र उपसले जाते जसे, शांत बसणे, मोठ मोठ्यांनी अश्रू ढाळणे, किंवा अगदी आत्महत्येची धमकी देणे. सियाच्या बाबतीत तिच्या पालकांच्या दिलेल्या विधानानुसार, त्यांच्या मुलीचा कोणी बॉयफ्रेंड आहे याची त्यांना कल्पनाच नव्हती; तिचे लग्न ठरले तेव्हा ती अवघ्या 19 वर्षांची होती (?); आणि तिला केतनशी लग्न करायचे नव्हते हे त्यांना कधी जाणवलेच नाही. हे फक्त सियाच्या कुटुंबापुरते मर्यादित नाही. हे भारतातील कोट्यवधी पालकांचे, विशेषतः व्यावसायिक कुटुंबांचे प्रतिनिधित्व करते. 10 कोटी ते 500 कोटींचे साम्राज्य असलेले हे छोटे-मोठे व्यावसायिक स्वतःला मोठे राजे समजतात. ते स्वतःला खूप श्रीमंत समजतात, परंतु जागतिक उद्योजकांच्या तुलनेत ते किती लहान आहेत याची त्यांना जाणीव नसते. या करोडपती कुटुंबांमध्ये त्यांचे विचार किंवा इच्छा चालवण्यासाठी नोकरांची फौज असते. ते त्यांचे व्यवसाय अगदी त्यांच्या पालकांनी किंवा आजोबांनी जसे चालवले होते तसेच चालवतात—ज्यात शून्य नवकल्पना, दृष्टी किंवा नवीन विचार असतात. व्यवसाय कसेबसे टिकून राहतात, परंतु नवीन आणि चांगल्या कंपन्या निर्माण करण्याऐवजी कौटुंबिक दर्जा आणि प्रतिष्ठा राखण्यावरच त्यांची सर्व महत्त्वाकांक्षा केंद्रित असते. घरी सर्व सुखसोयी आणि कामाच्या ठिकाणी फारसे नाविन्य नसताना, हे व्यावसायिक आपले लक्ष सामाजिक प्रतिष्ठेकडे वळवतात. समाजात मोठेपणा मिरवणे, केवळ वरवरच्या गोष्टींचे प्रदर्शन करणे आणि इतर समवयस्कांकडून कौतुक मिळवणे यातच ते धन्यता मानतात. आपल्या मुलांवर पूर्ण नियंत्रण ठेवण्यापेक्षा आणि त्यांच्याकडून आपल्या निरर्थक, भडक आणि अवाढव्य लग्नांना मान्यता मिळवून देण्यापेक्षा कौतुक मिळवण्याचा दुसरा चांगला मार्ग कोणता असू शकतो? संपत्तीचे प्रदर्शन करणे, एका 'आज्ञाधारक मुला'चे प्रदर्शन करणे—कमीत कमी काही क्षणांसाठी तरी—व्यावसायिक कुटुंबाला समाजात मान्यता मिळवून देते, कारण ते अशा डेस्टिनेशन वेडिंगजवर फटाके आणि कोट्यवधी रुपये उडवतात. ऑनलाइन अनेक तरुण महिलांनी सिया गोयलला सहानुभूती दाखवली आहे. लग्न मोडण्याचा निर्णय कुटुंब आणि सामाजिक दबावामुळे किती कठीण असू शकतो, हे अनेकांना पटते; मात्र तीव्र आरोपांच्या पार्श्वभूमीवर अशा प्रतिक्रिया वादग्रस्त ठरत आहेत. मुले मोठी होतात. ती प्रेमात पडतात, त्यांना डेट करायचे असते, स्वतःचे निर्णय स्वतः घ्यायचे असतात. स्वतःचे जीवन जगण्याची इच्छा, स्वातंत्र्य किंवा स्वतःच्या आयुष्यावर नियंत्रण असणे ही एक मूलभूत मानवी गरज आहे. भारतीय पालक हे कधी समजून घेणार? हे व्यावसायिक कुटुंब कधी समजून घेणार की त्यांची मुले म्हणजे समाजात दाखवण्याची एखादी 'ट्रॉफी' नाहीत? आणि लग्नाचे ते दिखाऊ प्रकार किती हास्यास्पद आणि भडक असतात? त्यापेक्षा तो पैसा आर अँड डी (संशोधन आणि विकास ) वर का खर्च केला जात नाही? चीनच्या व्यावसायिक क्षेत्राकडे कधी पाहिले आहे का? उदयपूरमध्ये एका लग्नावर 10 कोटी रुपये उडवण्यापेक्षा आपल्या मुला-मुलींसाठी रोबोटिक्स कंपन्या स्थापन करण्याचा विचार व्यावसायिक का करत नाहीत? पण मग हा सगळा पालकांचाच दोष आहे का? की जेन झी मुले पूर्णपणे निर्दोष आहेत? नाही. प्रथम, या प्रकरणात, आरोपी जेन झी मधील आहेत. एखाद्या व्यक्तीचा जीव घेण्याऐवजी आपल्या पालकांच्या जुनाट, बुरसटलेल्या आणि चुकीच्या विचारांच्या विरोधात उभे राहण्याचे धैर्य त्यांच्यात असायला हवे होते. जेन झी ने घरातील या प्रतिगामी प्रथांविरुद्ध ठामपणे उभे राहिलेच पाहिजे. ज्या दिवशी तुम्ही थोडीशी तडजोड करता — उदा. इच्छा नसतानाही एखाद्या लग्नाच्या स्थळाला (रिश्त्याला) भेटणे, मद्यपान केल्याचे स्पष्टपणे सांगण्याऐवजी लपूनछपून बिअर पिणे, किंवा दुसऱ्या कोणाशी तरी संबंध असतानाही लग्नाच्या प्रस्तावाला होकार देणे — त्या दिवशी तुम्ही तुमच्या पालकांच्या अशा प्रतिगामी वर्तनाला नकळत प्रोत्साहनच देत असता. हे थांबवा. ठाम भूमिका घ्या. आधीच्या पिढीला सांगा की ते चुकीचे आहेत. यात काहीच गैर नाही. ज्येष्ठांबद्दलच्या या दिखाऊ 'आदरा' पायी भारताने खूप काही सोसले आहे आणि देश बराच मागासलेला राहिला आहे. व्यावसायिक कुटुंबांमधील जेन झी मुलांसोबत आणखी एक समस्या आहे, ज्यामुळे त्यांना पालकांसमोर उभे राहणे कठीण जाते. ते स्वतः कष्ट करून कमावण्यापूर्वीच अत्यंत आरामाचे आयुष्य जगू लागतात. या आर्थिक परावलंबनामुळे त्यांचे भावनिक स्वातंत्र्य मिळवणे अधिक कठीण होते. ते कधीही नीट अभ्यास करत नाहीत, दर्जेदार पात्रता मिळवत नाहीत, व्यवसाय नीट शिकत नाहीत आणि त्यांच्यात कधीही व्यवसायाला पुढच्या पातळीवर नेण्याची भूक किंवा जिद्द निर्माण होत नाही. परिणामी, ते आपल्या आयुष्यासाठी पूर्णपणे आई-वडिलांच्या पैशावर अवलंबून राहतात. यासाठी ते "माय सपोर्ट सिस्टीम" (माझा आधार) असा गोंडस शब्द वापरतात, जो प्रत्यक्षात त्यांच्या अपंगत्वाचा आणि परावलंबनाचा कुबडीसारखा वापर आहे. तुम्ही आरामात मोठे झालात. तुम्ही कधीही संघर्षाला सामोरे गेला नाहीत आणि स्वतःच्या हिमतीवर यशस्वी झाला नाहीत. त्यामुळे वास्तव जग कसे चालते हे तुम्हाला कधी समजलेच नाही. जेव्हा तुमचे आई-वडील तुमचे सर्व बिल भरतात आणि तुमच्या जीवनशैलीचा खर्च उचलतात, तेव्हा त्यांच्यासमोर उभे राहणे सोपे नसते. तुम्हाला तुमचे स्वतःचे आयुष्य जगायचे आहे का? मग कोणावरतरी अवलंबून राहणे बंद करा. स्वतःच्या पायावर उभे राहा. आणि तुमच्या त्या खास दिवसासाठी आयोजित केलेल्या भडक, दिखाऊ लग्नसोहळ्यांना 'नाही' म्हणा. तुम्ही एखाद्या स्टेजवरील प्रदर्शनासारखे दिसता. भारतातील या श्रीमंत पण प्रतिगामी समाजाला आरसा दाखवण्याची वेळ आली आहे, जो आपल्या अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान करत आहे. अशा व्यवसायांना जागे करणे गरजेचे आहे जे सामान्य दर्जाचे राहिले आहेत आणि जेन झी ला अशा टोकावर नेत आहेत जिथे त्यांना गुदमरल्यासारखे वाटते. अशा टोकाच्या पाऊलांपर्यंत जाण्याची वेळ का येते? व्यावसायिक कुटुंबांनी बदलण्याची आणि या जुनाट मूल्यव्यवस्थेपासून सुटका करून घेण्याची हीच खरी वेळ आहे.

**लेखक : चेतन भगत**

**भाषांतर : प्रियदर्शन भवरे**

**साभार: द टाइम्स ऑफ इंडिया/**

**30 जून 2026**


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
• महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
• सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
• शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
• हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अ‍ॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.
डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०१ जुलै २०२६


## व्हॉईस ऑफ मीडिया जिंतूरची पत्रकारांच्या सन्मान व सुरक्षिततेसाठी ठोस कारवाईची मागणी




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : पत्रकारांचा अवमान करणारी वक्तव्ये लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचविणारी असून पत्रकारांचा सन्मान व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी शासनाने ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी व्हॉईस ऑफ मीडिया, जिंतूरच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली. याबाबतचे निवेदन तहसीलदार शितल कचवे यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले.निवेदनात म्हटले आहे की, शिवसेना (शिंदे गट) चे खासदार संजय दिना पाटील यांनी एका पत्रकाराबाबत केलेल्या कथित अपमानास्पद वक्तव्यामुळे राज्यभरातील पत्रकारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. पत्रकार हे लोकशाहीचे चौथे स्तंभ असून शासन, प्रशासन आणि जनतेमधील महत्त्वाचा दुवा म्हणून कार्य करतात. सत्य घटनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे, लोकहिताचे प्रश्न मांडणे आणि सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे हा पत्रकारांचा घटनात्मक अधिकार आहे. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधींकडून पत्रकारांबाबत अवमानकारक भाषा वापरणे ही अत्यंत गंभीर बाब असून मुक्त पत्रकारितेला बाधा आणणारी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.पत्रकारांचा अवमान, धमक्या किंवा त्यांची प्रतिष्ठा कमी करण्याचे प्रयत्न कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत. अशा घटनांमुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेबाबत चिंता निर्माण होत असून समाजात चुकीचा संदेश जात असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.शासनाने संबंधित प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधित खासदारांच्या कथित वक्तव्याची चौकशी करावी, त्यांच्याकडून पत्रकारांची जाहीर माफी मागवावी, पत्रकारांचा सन्मान, सुरक्षितता व अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी स्पष्ट भूमिका जाहीर करावी तसेच भविष्यात पत्रकारांचा अवमान करणाऱ्यांविरुद्ध आवश्यक ती कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करावी, अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.महाराष्ट्राची पुरोगामी परंपरा, लोकशाही मूल्ये आणि मुक्त पत्रकारितेचा सन्मान कायम राखण्यासाठी या प्रकरणात तातडीने व ठोस कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही निवेदनात व्यक्त करण्यात आली.या निवेदनावर महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया, ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर, मंचकराव देशमुख, सचिन रायपत्रीवार, भागवत चव्हाण, आनंद मुरक्या, रंगनाथ गडदे, किसानप्रसाद खाडे, प्रभाकर कुऱ्हे, शंकर जाधव, गुलाब शिंदे, मुंजा कंठाळे, संतोष लहाने, दिलीप देवकर, आबासाहेब जाधव, पद्माकर कौसडीकर, अशोक उकंडे, राम रेघाटे, श्रीपाद जोशी, चंद्रकांत गवळी आणि रामकिशन ठोंबरे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ग्राहक पंचायत पुढाकाराने अन्न व औषध प्रशासन विभागाचे मार्गदर्शन




**कन्नड (अरुण थोरात)** : अखिल भारतीय ग्राहक पंचायत, कन्नड यांच्या वतीने आज शासकीय विश्रामगृह, कन्नड येथे अन्न व औषध प्रशासन व वैध मापन शास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने मार्गदर्शन बैठकीचे यशस्वी आयोजन करण्यात आले.बैठकीस अन्न व औषध प्रशासन विभाग चे अन्न सुरक्षा अधिकारी फरीद सिद्दीकी, मा. उपनियंत्रक शिवहरी मुंडे तसेच वैध मापन शास्त्र निरीक्षक राजेंद्र व्यवहारे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून व्यापारी व नागरिकांना विविध कायदे, नियम व शासकीय प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली.यावेळी अन्न सुरक्षा व मानके कायदा, एफएसएसएआय परवाना, औषध विक्रीसंबंधी नियम, वजन व माप यंत्रांची पडताळणी, ग्राहक संरक्षण, विविध विभागीय नियमांचे पालन तसेच व्यवसाय करताना घ्यावयाची काळजी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित व्यापारी, हॉटेल व रेस्टॉरंट व्यावसायिक, किराणा दुकानदार, दूध डेअरी चालक, वजन-माप व्यवसायिक तसेच इतर नागरिकांनी आपल्या अडचणी, समस्या व शंकांचे निरसन करून घेतले.मार्गदर्शन सत्रात अधिकारी यांनी व्यापाऱ्यांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले तसेच प्रशासन व व्यापारी यांच्यात समन्वय राहिल्यास ग्राहकांना अधिक चांगली सेवा देता येईल, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय ग्राहक पंचायत, कन्नड चे तालुका अध्यक्ष रुपेश भारुका यांनी केले. त्यांनी उपस्थित सर्व मान्यवर, अधिकारी, व्यापारी व नागरिकांचे आभार मानून अशा मार्गदर्शनपर उपक्रमांचे आयोजन भविष्यातही करण्यात येईल, असे सांगितले.या बैठकीस रामदास ठोंबरे संघटन मंत्री (देवगिरि प्रांत), धनंजय मुळे उपाध्यक्ष देवगिरी प्रांत, एडॉ स्वप्निल उपासनी, रोहित पीरथानी, सुनील गंगवाल, दिलीप पवार, रामचंद्र लालवानी, सहयोज जावले, वर्षा लहाने विविध व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी, व्यापारी, उद्योजक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी सेवा उपक्रम राबवावेत - राज्यसभा खासदार रामराव वडकुते यांचे आवाहन



**हिंगोली (गोपाल सातपुते)** : राज्यसभा खासदार रामराव सखाराम वडकुते यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी हार-तुरे, पुष्पगुच्छ, बॅनर, होर्डिंग्ज, स्वागत कमानी, फटाक्यांची आतषबाजी तसेच इतर अनावश्यक खर्च टाळावा आणि त्याऐवजी समाजहितासाठी सेवा कार्ये राबवून वाढदिवस साजरा करावा, असे आवाहन त्यांनी सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, समर्थक, हितचिंतक आणि नागरिकांना केले आहे.यावर्षी 1 जुलै रोजी खासदार रामराव सखाराम वडकुते हे उज्जैन येथील श्री महाकालेश्वर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेणार असून, भगवान महाकालाच्या चरणी महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील शेतकरी सुखी, समृद्ध आणि कर्जमुक्त होवोत, अशी प्रार्थना करणार आहेत. तसेच यावर्षी महाराष्ट्रावर एल निनो (El Niño) चा प्रतिकूल परिणाम कमी राहावा, राज्यात समाधानकारक पाऊस पडावा, शेती पिकांनी बहरून जावी, दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण होऊ नये आणि प्रत्येक शेतकऱ्याच्या जीवनात आनंद, समृद्धी व भरभराट यावी, असे साकडे ते भगवान महाकालाला घालणार आहेत.वाढदिवस हा केवळ उत्सवाचा दिवस नसून समाजाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करण्याची आणि सामाजिक बांधिलकी जपण्याची संधी आहे. त्यामुळे वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून गरजू आणि वंचित घटकांच्या मदतीसाठी पुढाकार घ्यावा. रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप, वृद्धाश्रम व अनाथालयांना मदत, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, स्वच्छता अभियान, अन्नदान, पाणपोई तसेच पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम राबवावेत, असेही त्यांनी आवाहन केले आहे.समाजसेवा हीच खरी ईश्वरसेवा असून, वाढदिवसानिमित्त होणारा प्रत्येक खर्च समाजाच्या कल्याणासाठी उपयोगात आणणे हीच खरी वाढदिवसाची भेट ठरेल. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे भव्य स्वागत, सत्कार किंवा दिखाऊ कार्यक्रम आयोजित न करता प्रत्येक गावात किमान एक समाजोपयोगी उपक्रम राबवावा, असे त्यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले.सर्व नागरिक, कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी दिलेल्या प्रेम, विश्वास आणि शुभेच्छांबद्दल त्यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले असून, सेवा, संस्कार आणि समाजहित हीच आपल्या सार्वजनिक जीवनाची खरी दिशा असल्याचे त्यांनी नमूद केले.

## निधन वार्ता



**दौलताबाद** : रतनजी मोहल्ला, दौलताबाद येथील सय्यद फारुक सय्यद रऊफ (वय ५८) यांचे मंगळवार, दि. ३० जून रोजी दुपारी १ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.त्यांचा दफनविधी रात्री ८.३० वाजता अब्दीमंडी येथील बाओद्दीन अन्सारी दर्गा परिसरातील कब्रस्तानमध्ये पार पडला.त्यांच्या पश्चात पत्नी, आई-वडील, चार मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते दौलताबादचे माजी सरपंच सय्यद हारुन यांचे मोठे बंधू होत.